**ई-श्रम पोर्टलवर नोंदणीकृत असंघटित कामगारांना अपघात विमा प्रदान करणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग**
**शासन परिपत्रक असंका-११२३/ प्र.क्र. १२१/ काम-७अ**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२
दि. ०३ /११/२०२३

**वाचा:-** श्रम व रोजगार, मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. D.O.No M-16011/34/2021-SS-III Dated 31 August, 2023

**शासन परिपत्रक :-**

असंघटित कामगारांना सामाजिक सुरक्षितता पुरविण्याच्या उद्देशाने असंघटित कामगारांचा राष्ट्रीय डेटाबेस तयार करण्याचा निर्णय केंद्र शासनामार्फत घेण्यात आला आहे. त्यानुषंगाने दि. २६.८.२०२१ पासून असंघटित कामगारांची नोंदणी ई- श्रम पोर्टलवर सुरु करण्यात आली असून ई-श्रम पोर्टलवरील नोंदित असंघटित कामगारांना अपघाती विमा प्रदान करण्याचे केंद्र शासनाचे धोरण आहे. त्याअनुषंगाने नोंदणीकृत असंघटित कामगार/ दावेदारांकडून दावे आणि तक्रारी अनेक राज्यांना प्राप्त झाल्या आहेत. ई-श्रम पोर्टलवरील दिनांक २६.०८.२०२१ ते दिनांक ३१.०३.२०२२ पर्यंत नोंदित असंघटित कामगारांना अपघाती विमा प्रदान करण्याचा केंद्र शासनामार्फत निर्णय घेण्यात आला आहे.
सदर ऑनलाईन दावे निकाली काढण्यासाठी केंद्र शासनामार्फत मार्गदर्शक तत्त्वे व कार्यप्रणाली जारी करण्यात आली असून ऑनलाइन एक्स-ग्रेशिया (सानुग्रह) मॉड्यूल कार्यान्वित करण्यात येणार आहे. ०२. सदर मॉड्यूलच्या सुरळीत कामकाजासाठी केंद्र शासनामार्फत ऑनलाईन प्रशिक्षण दिनांक २८.०८.२०२३ रोजी आयोजित करण्यात आले होते. सदर प्रशिक्षणादरम्यान केंद्र शासनामार्फत मार्गदर्शक तत्वे व कार्यप्रणाली पुढील कार्यवाही करिता उपलब्ध करून देण्यात आली आहेत. याअंतर्गत प्रत्येक जिल्ह्यात एक जिल्हास्तरीय समिती देखील स्थापन केली जाईल. सदर जिल्हास्तरीय समितीमध्ये जिल्हाधिकारी हे अध्यक्ष असून जिल्हाधिकारी यांनी नियुक्त केलेले अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी हे सदस्य सचिव असतील तसेच कामगार अधिकारी हे समिती सदस्य असतील.

०३. सुलभ माहिती व पुढील कार्यवाहीकरिता मार्गदर्शक तत्वे व कार्यप्रणाली सोबत जोडली आहे. कामगार आयुक्त कार्यालयाअंतर्गत कार्यरत जिल्हा स्तरीय अधिकारी यांनी मार्गशदर्शक तत्वे व कार्यप्रणालीचे सविस्तर अवलोकन करावे व तद्नंतर संबंधित जिल्हाधिकारी यांना व्यक्तीश: संपर्क साधून एक्स-ग्रेशिया (सानुग्रह) मॉड्यूल बाबत सविस्तर माहिती अवगत करावी. तसेच सर्व जिल्हाधिकारी यांना या कार्यालयाअंतर्गत कार्यरत जिल्हा स्तरीय अधिकारी हे याबाबत व्यक्तीश: संपर्क साधून मार्गदर्शक तत्वे व कार्यप्रणाली बाबत सविस्तर माहिती अवगत करतील. याबाबत कामगार

आयुक्तांच्या स्तरावरून सर्व जिल्हाधिका-यांना व्यक्तीश: कळविण्यात आले आहे. त्यानुषंगाने प्रत्येक जिल्ह्याअंतर्गत जिल्हाधिकारी यांचे स्वतंत्र लॉग-इन तयार करणे आवश्यक असल्याने याबाबतचा सविस्तर तपशील जिल्हाधिकारी कार्यालयाने आयुक्त, असंघटित कामगार यांच्या कार्यालयास उपलब्ध करुन द्यावा व त्याप्रमाणे दावे निकाली काढण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

४) याबाबतील केंद्र शासनाचे पत्र व त्याबाबतची मार्गदर्शक तत्त्वे सोबत जोडण्यात येत आहेत.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२३११०३१५४७३९२७१० असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS

Digitally signed by SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY AND LABOUR DEPARTMENT, 2.5.4.20=3389518a88af500ef17fd52858804c56d5b0db93ce68c9638764849614f0c8b3, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=824DB7B32ED13AAC7B6F1F11E717770B52D6784F2BC41DDF0E4E9729CDB96F88, cn=SWAPNIL YASHWANTRAO KAPADNIS
Date: 2023.11.03 15:47:41 +05'30'

**( स्वप्निल कापडणीस )**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई.
२) प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय मुंबई.
३) अ.मु.स (महसूल) यांचे स्वीय सहायक मंत्रालय मुंबई.
४) सर्व उपसचिव (कामगार) उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय मुंबई.
५) सर्व जिल्हाधिकारी
६) विकास आयुक्त, (असंघटित कामगार) सातवा मजला, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, प्रशासकीय भवन, सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी मुंबई.
७) कामगार आयुक्त, कामगार भवन, सी-२०, ई-ब्लॉक, बांद्रा कुर्ला संकुल, बांद्रे (पुर्व), मुंबई.
८) अप्पर कामगार आयुक्त, कोकण ,पुणे, नागपूर.
९) उपआयुक्त कामगार,मुंबई शहर / मुंबई उपनगर पुर्व / मुंबई उपनगर पश्चिम/ ठाणे / रायगड /पुणे /नाशिक /संभाजीनगर / अमरावती.
१०) सर्व सहाय्यक कामगार आयुक्त,
११) निवडनस्ती (कामगार-७अ)